# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Marathi

## Assignment

## Session: 2018 – 2019

DATE / /

SEAL

नाव :- जयश्री भास्कर अनकर

कॉलेज :- यशोदा गर्ल्स आर्ट्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज नागपूर

विषय :- मराठी

वर्ग :- बी. कॉम प्रथम वर्ष

रोल नंबर :- ६८

Session 2018-2019

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce Colleg
Sneh Nagar, Nagpur-15

SEAL

SEAL

PAGE:
DATE: / /

# गद्य विभाग

प्रश्न 1 डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य समता व विश्वबंधुत्वाची जोपसना कश्या-प्रकारे व्यक्त करावयास सांगितली ? ते सांगा.

उत्तर:- डॉ बाबाहेब आंबेडकरांनी भारताला स्वातंत्र्य मिळवल्यानंतर राज्य घटना तयार करतांना सर्व वर्गाचा विचार केला आहे. लोकशाही म्हणजे काय ? तिचे भवितव्य काय ? लोकशाहीचा सत्ताधीश कोण ? लोकशाही कुणाकरिता व कशासाठी वापरावी ? लोकशाहीचे अंग कोणते ? लोकशाही ही नवीन अशी शासनव्यवस्था आहे काय ? लोकशाहीचा उगम कसा झाला ? लोकशाही ही हुकूमशाही किंवा एकाधिकारी सरकारपेक्षा कशा प्रकारे चांगली आहे ? वरील सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन योग्य अशी लोकप्रशासन व्यवस्था तयार करण्यासाठी समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्वाचा आधार घेवुन त्याप्रमाणे वागावयास सांगितले आहे. यशस्वी लोकशाही टिकविणे ही साधीसुधी गोष्ट नाही. समाज परिवर्तन हा त्याच्यामागचा उद्देश आहे. व्यक्ती हा भारतीय घटनेचा आधिष्ठान आहे. सर्वसामान्य लोकांना त्यांचे हक्क मिळविण्यासाठी कायद्यान्वये बंधने घालून मूलभूत हक्क प्रस्थापित केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात भारतासाठी लोकशाही नवीन नाही. त्याकरिता दोन हजार वर्षापूर्वीचा इतिहास सांगितला.

बौद्ध धम्माचे तत्वज्ञान व संघ याचे नियम सांगितले आहेत. दिनचर्या, कामकाज, सुत्रधार, बैठका, बहुमत, बसण्याचे ठिकाण अशी सुरुवात करुन लोकशाहीला ते प्रेरक आहेत. ते विचार करताना आपण पहिली गोष्ट विचारात घेतली पाहिजे. ती म्हणजे सनदशीर मार्गाचा अवलंब केला पाहिजे. त्याग असनदशीर मार्गाचा अवलंब केला तर लोकशाही टिकणार नाही.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे लोकशाही टिकविण्यासाठी व्यक्तीपुजा सोडली पाहिजे. आपली जनता ही भोळीभाबडी आहे. ती राजकारणातील व्यक्तीची पुजा करताना दिसते. त्यासाठी आपणास कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी व्यक्ती स्वातंत्र्याची फुले वाहू नयेत कारण व्यक्तीचे व्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाहीचे अत्यंत आवश्यक असे अंग आहे व्यक्ती स्वातंत्र्य काढून घेतले तर माणूस गुलाम होतो. लोकशाहीत गुलामगिरी नसते. पुजा करायची असली तर ती देशासाठी ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्याची पुजा करावी. शौर्याबद्दल आदर बाळगावे. स्वाभिमानाचा बळी देवून कोणालाही मनुष्य कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही आणि स्वातंत्र्याचा बळी देऊन कोणतेही राष्ट्र कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही. शीलाला बळी देवून कोणालाही

कोणालाही स्त्री हेतन राहू शकत नाही.
आणि स्वातंत्र्याच्या बळी देऊन कोणतेही
राष्ट्र कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही असा
भायसूचक संदेश, आयर्लंडच्या देशभक्त
आक्रोनेल आपले मनोगत व्यक्त करताना
दिसतो.

लोकशाहीला स्वातंत्र्य, समता, बंधुत्व
या तिन्ही तत्वांची आवश्यकता आहे. ते तिन्ही
अंग भिन्न दिसत असले तरी ते एक दुसऱ्याला
पूरक आहेत. लोकशाही ही सामाजिक, आर्थिक
व राजकीय स्वरूपाची असते. सामाजिक लोकशाही-
तच स्वातंत्र्य समता व बंधुत्व प्राप्त होऊ शकते.
स्वातंत्र्याच्या जोडीला समता आणि आणि
समतेच्या जोडीला बंधुत्व नसेल तर लोकशाहीला
अर्थ प्राप्त होत नाही. केवळ स्वातंत्र्य म्हणून
भागत नाही. केवळ समतेने लोकशाही टिकत
नाही. केवळ समतेने लोकशाही टिकत नाही किंवा
केवळ बंधुभाव वाढवून लोकशाही यशस्वी होऊ
शकत नाही. सामाजिक व्यवहारात लोकांचे संबंध
बंधुभावाच्या भावनेमधून येतात पण स्वीकारलेल्या
समतेचे तत्व सांभाळण्यासाठी कोणतेही काळजी
अत्यावश्यक आहे. कोणत्याही संघर्षाचा उगम
होऊन लोकशाही नष्ट होऊ शकते. व लोकशाहीला
धोका संभवतो असतो.

लोकशाहीची तीन अंगे आपल्यास
पाहता येतात. राजकीय आर्थिक व सामाजिक
लोकशाही विना राजकीय लोकशाही जन्म होऊ

PAGE :
DATE : / /

शकत नाही. राजकारणात समाज त्याची नीतिमूल्ये घडलेली असतात. आपण स्वातंत्र्याचा यथायोग्य वापर केला नाही तर नीतिमूल्यांचा ऱ्हास होऊन लोकशाही धोक्यात येईल. सामाजिक स्थैर्य टिकविण्यासाठी समतेच्या तत्वावर ती विचारात घ्यावी लागतात. व ते तत्व म्हणजे भगवान बुद्धांनी आपल्या संघाला जी सांगितलेली तत्व आहेत ही तत्वे आहेत. व्यवहारात हुकूमशाहीला वाव नसतो, लोकशाहीत हुकूमशाहीला वाव नसते. लोकशाहीत हुकूमशाही सारखी वागणूक दिली तर सत्तेचा ऱ्हास होऊन ती विश्वासाला जाते. सत्ता आणि राजकारण यांच्यामध्ये आर्थिकतेची बीजे असतात. त्यातून विषमतेची सुरुवात होते. भारताने लोकशाही पुन्हा जमाविली आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीत आपण जगलो तसे होता कामा नये. भारत हा देश आहे. या देशात लोकशाही सोबतच सत्तेच्या हातसपाटी हुकूमशाहीचा उदय होऊ शकतो.

डॉ. आंबेडकरांना समता स्वातंत्र्य बंधुत्वप्रणित लोकशाही तयार करण्यासाठी समाजात समता निर्माण करणे हेच एक प्रभावी साधन आहे. लोकशाही ही लोकांच्या प्रवृत्तीवर अवलंबून आहे. यशस्वी लोकशाहीचा मूलाधार म्हणजे नैतिक तत्व होत. आपण प्रत्यक्षात वेगळे आणि व्यवहारात वेगळे राहतो. लोकशाहीला अंतर्बाह्य स्वरूपात पाहिले तर

लोकशाहीला टिकवायचे आहे व त्याकरिता सदनशीर मार्गाचा अवलंब करणे आधिक गरजेचे आहे. आजच आपण स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व जयार करून त्यावाने वागण्यास सुरुवात केली पाहिजे असे डॉ. आंबेडकरांनी आवर्जून सांगितले आहे.

# पद्य विभाग

प्रश्न २:- 'घन बाजे घुणघुणा' या कवितेतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.
विरहिणीने सख्यांना कोणती विनंती केली आहे?

उत्तर:- श्रीकृष्णाच्या वेधाने तळमळणारी ही विरहिणी म्हणजे साक्षात परमेश्वराच्या भेटीसाठी आसुसलेले मन आहे. ज्ञानेश्वरांचे परमेश्वर प्रीतीसाठी हे आसुसलेले मन पुरवावया विरह अनुभवपणाच्या प्रेयसीसारखे आहे.

या विरहिणीला मेघांचा 'घुणुघुणु' असा नाद, झुणुझुणु वाहणारा वारा यातील सौंदर्य आवडेनासे होते. कारण श्रीकृष्णाचा वेध या विरहिणीला लागला आहे. बिछान्यावरचे काम रम्य चांदणे, चाफ्याची फुले, चंदन घटी इत्यादी शीतलोपचारही तिला निरर्थक वाटतात; चंदनाची चोळीही अंग भाजून काढते. बिछान्यावरील पुष्पशय्यासुद्धा तिला पोळत आहे. तिचा विरह शांत करण्यासाठी सख्या सुंदर गीत गात आहेत. पण या सर्व उपायांनी तिचा विरहदाह शमत नाही तर सारखा वाढतो आहे. म्हणून ती सख्यांना भवसागर तारून नेणारा श्रीकृष्ण कोठेतरी लवकर भेटावा अशी विनंती करीत आहे. आता या विरहिणीला आपले रूप आरशात दिसत नाही. (तिला आता परमेश्वराशिवाय स्वतंत्र व्यक्तिमत्त्वच उरले नाही.) विठ्ठलाने तिची वेड्यासारखी

PAGE:
DATE:
SEAL

अवस्था करून टाकली आहे.

SEAL
PAGE
DATE: / /

# गद्य विभाग

## प्रथम घटक :- चाचणी

प्र. 1. 'जिवंत हुगळीचा प्रवाह अबोध व अपारदर्शक तितकाच हा देवळाचा प्रवाहही' हे वाक्य कोणत्या गोष्टींचे वर्णन करताना आले आहे?

उत्तर :- हुगळीच्या मुक्त किनाऱ्यावर दक्षिणेश्वराचे देऊळ आहे. बेलूर ते दक्षिणेश्वर अशा नावा चालतात. दक्षिणेश्वराच्या देवळात धर्मभावनेने जमलेल्या स्त्री-पुरुषांचे थवे लोटले आहे. त्यात लाल रंगविलेल्या लाल ओठांच्या विपुल केशसंभाराच्या, मांसल देहाच्या बंग स्त्रिया होत्या. चौकटीच्या साड्या त्यांनी परिधान केलेल्या होत्या. पदराला किल्ल्यांचे जुडगे होते, भांगात शेंदूर होता. बंगभाषेत त्यांचे बोलणे चालले होते. पारदर्शक पातळ, शुभ्र मलमल भूषणे त्यांनी घेतलेली होती. पुरुषांनी पोकळ कासोट्याचे वस्त्र घातलेले होते. धोतरात सुद्धा खोचणारे उघड्या माथ्याचे शालीचे लपेटे सावरणारे हातात गुडगुड्या नाचविणारे! तरुण केस वाढविलेले, सरसूच्या तेलाने कपाळ ओथंबणारी पोरं, पांढऱ्या वस्त्रातल्या विधवा. कुंकुम घातलेल्या गंध लावलेल्या बुटमोजे सोडलेले धोतर व बंद गळ्याच्या कोटात सजलेले प्रतिष्ठित महाजन! हे सर्व प्रकारचे वयोगटातले स्त्री-पुरुष दक्षिणेश्वर मंदिरात

होत. त्यांच्या चेहऱ्यावर कुठे हृदयात प्रतिबिंब आढळत नाही. इच्छा, भावना, हृदयाच्या बाधेचे कोणतेही चित्रण इथे आढळत नाही. कुबरीच्या प्रवाहाप्रमाणेच हा चेहऱ्याचाही प्रवाह अबोध व अपारदर्शक होतो.

ही माणसे आहेत की सावल्या? यांना हृदय होते की नाही हृदय असेल तर त्याचा साक्षात्कार त्यांच्या चेहऱ्यावर कुठेच होऊ नये? स्वरात, शब्दात, हालचालीत कुठेच ह्या साक्षात्काराचा प्रभाव जाणवत नाही.

प्रश्न २) १९२० साली माणगाव या संस्थानात भरलेल्या अस्पृश्य परिषदेत राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यासाठी कोणते उद्गार केले?

उत्तर:- शिक्षणाबरोबर आपल्या राज्यात नोकरीचे धोरण शाहू महाराजांनी अवलंबिले. पन्नास टक्के नोकऱ्या अस्पृश्यांना राखुन ठेवणारा भारतातील शाहू हा एकमेव राजा होता. १९२० साली माणगाव या शाहू महाराजांच्या संस्थानातील अस्पृश्यता परिषद भरली होती. राजर्षी शाहू महाराज त्यातील अध्यक्ष होते. त्यांनी सन्मान स्वीकारून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यांना बोलावणे जाले. या परिषदेच्या अध्यक्ष स्थानातून माणसासारखे वागविल्याशिवाय शाहू महाराजने जाहीरपणे म्हणाले, "राजकरण व अस्पृश्यता यांचा संबंध काय? याचा कोणाचा कोणाशी संबंध नाही. सगळ्यांना माणसासारखे वागविल्याशि-वाय आपले राजकरण कसले त्यास सगळे बंधु आहेत. आम्ही मुक्त स्वराज्य हवे असेल त्यांनी उत्तर देशाप्रमाणे या देशात माणसांचे सर्व अधिकार हरिजनांना दिले पाहिजेत."

PAGE :
DATE :

SEAL

# पद्य विभाग

प्र. 1 मनाची चंचलता कवयित्रीने कशी व्यक्त केलेली आहे?

उत्तर:- 'मन' ही कविता बहिणाबाईंच्या चिंतनशील प्रवृत्तीची साक्ष देणारी आहे. मनाचे चांचल्य सर्वश्रुतच आहे. मानसशास्त्रज्ञांनीसुद्धा ही गोष्ट मान्य केलेली आहे. कवयित्री बहिणाबाई लिहितात - मन हे ओढाळ आहे. मनाची अवस्था पिकात शिरणाऱ्या ढोरासारखी आहे. त्याला कितीही हाकला ते फिरून पिकावर येतच असते. मनाला संचार करायला विविध वाटा आहेत. पाण्यावर विविध लाटा याव्यात तसाच हा प्रकार आहे. मन हे लहरी त्याला कोणीही धरून ठेवू शकत नाही. मनाची स्थिती वावटळीसारखी आहे. मन हे आले जहर आहे. मनाला कलुषित व्हायला वेळ लागत नाही. विंचू सापाच्या विषाला अंगाऱ्याचा उतारा तरी असतो पण मन विषारी झाल्यावर त्याला काही औषध नाही. मन हे पाखरासारखे आहे. ते आता क्षणात जमिनीवर तर आता आकाशात अशीच स्थिती असते. मनाच्या ठिकाणी विजेची चंचलता असते. मनाच्या आकार खसखशीच्या दाण्यासारखा लहान तर दुसऱ्या बाजूला आकाशही पाचवणार नाही अशी मनाची मोठी व्याप्ती. मनाची निर्मिती म्हणजे देवाची कारामतच होय. मन म्हणजे देवाला जागेपणी पडणारे स्वप्न आहे. मनाची अशी चंचलता बहिणाबाईंनी वर्णन केलेली आहे.

PAGE :
DATE :
SEAL

प्रश्न २-> गणपत वाणी या कवितेचा सारांश लिहा?

उत्तर:- गणपत वाणी बिडी पिताना नुसतीच काडी चावत असे. बिडी चावण्याचे कारण की त्याला त्याच्या जागेवर माडी बांधायची होती ही चावणे झाले की उजवा डोळा मिचकवत असे. डावी भिवई उडवित असे आणि ही काडी तो अशी काडी मिरकावयाचा की ज्याप्रमाणे बेसुर सुरु गवई वकुन देतो. गि-हाइकाची तो मर्जी सांभाळत असे. जिरे, धने, धान्य गाळीव धान्य, तिळाचे आणि खोबरेल तेल विकुन त्याच्या दुकानात पक्का हेवील असे. त्याचे स्वप्न तो थोडा वेळ बाजूला ठेवून तुभारायगाथा लेवून वाचत असे व त्याच्या स्वप्नावर बिडी पणाती धुर सोडीत असे. गोणपाट, त्यावर विटकर रंगाची सतरंगी आणि उशी म्हणून पीले. त्याच्या बापूला तुपाच्या वास अशाप्रकारचे जीवन ह्या वाण्यास माहीत होते, माडी बांधण्याच्या स्वप्नापायी गणपत वाण्याने काडाची भाडे केलीत. ही त्याचे काडे दुकानातल्या जमिनीच्या नेहमीसाठी खुप रुतलील बिडी म्हणून उपयोगात आणाले. त्या काड्या ज्या गणपत वाण्याने चावून फेकून दिल्यास त्या दुकानातल्या जमिनीत नेहमीसाठी खुप रुतल्यात. बापडा गणपत वाणी बिडी पितांना मरून गेला! पण त्याच्या कडून माडी बांधने झाले नाही.

PAGE :
DATE :

SEAL

आंधळा देवाला एक डोळा मागतो. पण देव त्याला दोन डोळे देतो. दुप्पट काटकसर करूनही ध्येय साध्य होत नाही.
( झाडाची भाडे व बिडीगुंडी भाडे)

PRINCIPAL
Taywade Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

SEAL